नि.फौ.ख.क्र. : २८६/२०२२
सरकार विरुध्द वैभव वगैरे
निशाणी क्रमांक : ३७

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी.**
**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | | |
|---|---|---|---|
| माझे नांव | :- आरती अरुण शेलार | वय | :- २८ वर्षे, |
| व्यवसाय | :- शेती | राहणार | :- बोधेगाव |
| तालुका | :- शेवगाव | जिल्हा | :- अहिल्यानगर |

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. एस.व्ही. कापडणीस यांचे मार्फत :-**

१. मी आरोपींना ओळखते, कारण ते आमच्या भावकीतील आहेत. घटना कधी घडली ते मला आठवत नाही. त्यावेळी आरोपी व माझ्यामध्ये किरकोळ वाद झाले. त्याव्यतिरिक्त काहिही घडले नाही. मी रागाच्या भरात आरोपींविरुध्द शेवगाव पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली. आता मला फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. फिर्यादीवरील अंगठयाला **निशाणी क्रमांक ३८** देण्यात येते.

साक्षीदार पुर्वीच्या जबाबाच्या विसंगत साक्ष देत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात ग्राहय असणारे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात आली.

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २९/०९/२०२२ रोजी सायंकाळी ५.३० वाजताचे सुमारास मी बाबासाहेब शेलार यांच्या शेताजवळ आले असता माझा चुलत दिर वैभव नवनाथ शेलार हा तेथे आला व जुन्या वादाच्या कारणावरुन मला व माझ्या पतीला घाणघाण शिवीगाळ करु लागला. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत मी घरी गेल्यावर माझ्या पतीला सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा त्याला राग येउन त्याने पुन्हा मला व माझ्या पतीला घाणघाण शिवीगाळ केली व तुम्ही फार माजले आहात असे म्हणाला. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा प्रकार पाहून त्याचे वडिल नवनाथ रामभाउ शेलार हातात कोयता घेउन आले व त्या कोयत्याने माझ्या पतीच्या उजव्या हाताच्या तळव्यावर कोयता मारला. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे भांडण सोडवासोडव करण्यासाठी माझी सासू भामाबाई मच्छींद्र शेलार आली तिला देखील त्यांनी शिवीगाळ केली व परत नादाला लागलात तर जीवे मारण्याची धमकी दिली.

३. आता मला माझ्या तक्रारीतील अधोरेखांकित भाग 'अ' मधील मजकूर वाचून दाखवला. हा मजकूर मी तक्रार देतांना मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो माझ्या तक्रारीत का लिहिला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या तक्रारीतील मजकूर मला

पोलीसांनी वाचून दाखवला व त्यानंतर मी त्यावर सही केली.  हे म्हणणे खरे आहे की, आमचे वाद न्यायालया बाहेर तडजोडीने मिटले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमचे आपसात तडजोड झाल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. एल. एच. लांडे यांच्या वतीने :-**

३. नाकारला.

फेरतपासणी नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

sd/-
(आर.आर. भद्रे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), शेवगाव

ठिकाण : शेवगाव
दिनांक : २५/०३/२०२६

नि.फौ.ख.क्र. : २८६/२०२२
सरकार विरुध्द वैभव वगैरे
निशाणी क्रमांक : ३९

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांची जबानी.**
**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | | |
|---|---|---|---|
| माझे नांव | :- अरुण मच्छींद्र शेलार | वय | :- ३२ वर्षे, |
| व्यवसाय | :- शेती | राहणार | :- बोधेगाव |
| तालुका | :- शेवगाव | जिल्हा | :- अहिल्यानगर |

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. एस.व्ही. कापडणीस यांचे मार्फत :-**

१. मी आरोपींना ओळखतो, कारण ते आमच्या भावकीतील आहेत. घटना कधी घडली ते मला आठवत नाही. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला नाही.

साक्षीदार पुर्वीच्या जबाबाच्या विसंगत साक्ष देत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात ग्राहय असणारे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली, परवानगी देण्यात आली.

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २९/०९/२०२२ रोजी सायंकाळी ५.३० वाजताचे सुमारास माझी पत्नी आरतीने मला सांगितले की शेतातून घरी येताना आबासाहेब शेलार यांच्या शेताजवळ आले असता माझा चुलत भाउ वैभव नवनाथ शेलार हा तेथे आला व जुन्या वादाच्या कारणावरुन तिला व मला घाणघाण शिवीगाळ करु लागला. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत तिने घरी गेल्यावर मला सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा त्याला राग येउन त्याने पुन्हा तिला व मला घाणघाण शिवीगाळ केली व तुम्ही फार माजले आहात असे म्हणाला. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा प्रकार पाहून त्याचे वडिल नवनाथ रामभाउ शेलार हातात कोयता घेउन आले व त्या कोयत्याने माझ्या उजव्या हाताच्या तळव्यावर कोयता मारला त्यामूळे मला जखम झाली. मला सदरची जखम धसकटावर पडल्यामूळे झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे भांडण सोडवासोडव करण्यासाठी माझी आई भामाबाई मच्छींद्र शेलार आली तिला देखील त्यांनी शिवीगाळ केली व परत नादाला लागलात तर जीवे मारण्याची धमकी दिली.

3. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग ‘अ’ मधील मजकूर वाचून दाखवला. हा मजकूर मी जबाब देतांना मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो माझ्या जबाबात का लिहिला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या जबाबातील मजकूर मला पोलीसांनी वाचून दाखवला व तो खरा व बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे वाद न्यायालया बाहेर तडजोडीने मिटले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमचे आपसात तडजोड झाल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. एल. एच. लांडे यांच्या वतीने :-**

३. नाकारला.

फेरतपासणी नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

sd/-
(आर.आर. भद्रे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), शेवगाव

ठिकाण : शेवगाव
दिनांक : २५/०३/२०२६